| | | |
|---|---|---|
| MHK | **नियमित दिवाणी दावा क्र. ६६२/२०१२ नि.७१ वरील आदेश** | **दत्ता आप्पा पुजारी व इतर<br>वि.<br>लक्ष्मण मारुती घाटगे व इतर** |

**१.** प्रस्तुतचा दावा वादी यांनी खरेदीपत्र पुरे होवून मिळणेकरीता व कायम मनाई हुकुम मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादी यांनी प्रस्तुत दाव्यात आदेश ३९ नियम १,२ व कलम १५१ प्रमाणे तात्पुरता मनाई आदेश मिळणेविषयीचा प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जात कथन केले आहे की, जिल्हा व तुकडी कोल्हापूर पो. तुकडी हातकणंगले तहसील पैकी मौजे कबनूर ग्रामपंचायत हद्दीतील गट क्र.६६० क्षेत्र हे. २.५३ आर, आकार रु.२८.१२ पैसेची यार्पकी प्रतिवादी क्र.१,२ व प्रतिवादी क्र.३ ते ६ यांचे पूर्वक्कदार व प्रतिवादी क्र.१३ ते १६ यांचे पूर्वहक्कदार यांचे मालकी हक्काची व मालकी वहिवाटीची क्षेत्र हे.१.६९ आर, आकार रुपये १८.७५ पैसेची जमीन यापैकी उत्तर बाजूकडील क्षेत्र ह.०.८० आर, आकार रुपये ८.८७ पैसेची जमीन यासी चतुःसिमा पुर्वेस–ओढा, पश्चिमेस–सरकारी रस्ता, उत्तरेस– गट नं.६६० पैकी रामा व सुभाष मारुती घाटगे यांचे कब्जातील जमीन, दक्षिणेस– गट नं.६६० पैकी शिल्लक आदिशा पिराप्पा केटकाळे यांची जमीन यापुढे संक्षिप्तमध्ये 'दावा मिळकत' संबोधण्यात आले आहे.

**३.** प्रतिवादी क्र.१५ यांनी प्रस्तुतच्या अर्जावर नि.७५ प्रमाणे व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी नि.७६ प्रमाणे त्यांचे लेखी म्हणणे दिले आहे. प्रतिवादी क्र.४ ते १४, १६ हे त्यांचे वकीलामार्फत दाव्यात हजर असलेतरी त्यांनी सदरच्या अर्जावर म्हणणे दाखल केलेले

नाही. वादी व प्रतिवादी यांनी त्यांचे आरोप व बचाव याचे पृष्ठर्थ त्यांनी आपले म्हणणे व कागदोपत्री पुरावे देखील हजर केलेले आहेत, त्यांचे म्हणणे व कागदोपत्री पुरावे खाली नमूद मुद्दयांच्या चर्चेवेळी विचारात घेतले जातील.

**४.** अर्ज, म्हणणे, प्रकरणातील कागदपत्रे पाहिल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारार्थ निघतात. त्यावर मी कारणांसहित निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी केस सिध्द करतो काय ? | होय. |
| २. | सोयीस्करतेची तुला वादीच्या बाजुने आहे असे तो सिध्द करतो काय ? | होय. |
| ३. | मागणी केल्याप्रमाणे तुर्तातूर्त मनाई न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे असे वादी सिध्द करतो काय ? | होय. |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजुर केला. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ ते ३ करिता

**५.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांचे विरोधात, प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये जाणेच्या रस्त्याचे वहिवाटीस हरकत, अडथळा करु नये याकरीता दाखल केला आहे. वादी यांचे कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमये जाणेच्या वादीचे वहिवाटीस अडथळा निर्माण करणेचा प्रयत्न रस्त्याच्या ठिकाणी खांब उभे करुन छप्पर बांधून वादीचा रस्ता बंद करुन वादीच्या वहीवाटीस अडथळा निर्माण केला आहे. म्हणून प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे.

६.　　प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी नि.७६ व प्रतिवादी क्र.१५ यांनी नि.७५ कडे आपले म्हणणे देवून वादी यांचे कथन नाकारले आहे, त्यांचे असे कथन आहे की, वादी जो रस्ता किंवा हक्क सांगत आहे त्या रस्त्याचा उल्लेख दावेमध्ये नाही. तसेच तथाकथीत रस्ता हा दावा विषय नाही व रस्त्याबाबतीत दावेमध्ये दाद मागितली नाही. प्रस्तुत अर्ज फक्त काम लांबवण्याच्या हेतूने दिलेला आहे म्हणून नामंजूर करावा. इतर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही.

७.　　वादी तर्फे वकील श्री.एम.डी.जमादार व प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे श्री.पी.ए.उपाध्ये वकील व प्रतिवादी क्र.१५ तर्फे श्री.बी.एस.पाटील वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

८.　　वादी यांनी दि.१७/०७/१९९६ च्या नोंदणीकृत साठेखताप्रमाणे खरेदी खत करुन देणेकरीता व वादी यांचे कब्जे वहिवाटीमध्ये प्रतिवादी व त्यांचे मार्फत इतर कोणीही हरकत, अडथळा करुन नये यासाठी दावा दाखल केला आहे. सदरचा दावा हा वादी यांचे उलटतपासाकरीता प्रलंबीत आहे. ही बाब मान्य आहे की, प्रतिवादी यांनी नियमीत दिवाणी दावा क्र.५८३/२०१२ वाटणीकरीता दाखल केला होता. तो दावा गुणदोषावर चालून नामंजूर झाला आहे. त्या दाव्याच्या साक्षीपुराव्यामुध्ये दावा मिळकत ही वादी यांचे कब्जे वहीवाटीमध्ये आहे असे उपलब्ध कागदोपत्री पुराव्यामधून दिसून येते. म्हणून दावेचा अंतिम निर्णय लागेपर्यंत वादी यांचे कब्जे वहिवाटीला संरक्षण देणे आवश्यक आहे.

**९.** वादी यांचे कथनाप्रमाणे प्रतिवादी हे वादी यांचे कब्जेवहीवाटीस हरकत अडथळा करणेचे उद्देशाने रस्ता अडवणेचा व रस्त्यामध्ये खांब उभे करुन छप्पर बांधून रस्ता बंद करणेचा प्रयत्न करीत आहे. वादी यांचे कथनाप्रमाणे व दि.१७/०७/१९९६ च्या साठेखताप्रमाणे दावा मिळकतीच्या पश्चिम बाजूस रस्ता आहे. वाद मिळकतीच्या पश्चिमबाजूस रस्ता नाही असे प्रतिवादी यांचे कथन नाही. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, तथाकथीत रस्ता हा प्रस्तुत दाव्यामध्ये वाद विषय नाही म्हणून वादी यांना रस्त्याबाबत दाद मागता येणार नाही. परंतु वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, दावा मिळकतीचे कब्जेवहीवाटीसाठी जाणेकरीता प्रतिवादी हे हरकत अडथळा करुन रस्ता बंद करणेचा प्रयत्न करीत आहेत. जर रस्ता बंद केला तर वादी यांना दावा मिळकतीची वहीवाट करण्यास अडथळा निर्माण होईल. रस्ता बंद करणे हे प्रतिवादी यांचा वाईट हेतू आहे की जेणे करुन वादी हे दावा मिळकतीची वहिवाट करु शकणार नाहीत. प्रथमदर्शनी दावा मिळकत ही वादी यांचे कब्जे वहीवाटीमध्ये आहे म्हणून दाव्याचा अंतिम निर्णय लागे पर्यंत वादी यांचा दावा मिळकतीतील कब्जा व वहिवाटीला संरक्षण देणे आवश्यक आहे.

**१०.** प्रतिवादी यांचे विधीज्ञ श्री.बी.एस.पाटील यांनी असा युक्तीवाद केला की, दाव्यामध्ये दावा मिळकतीचा उल्लेख केला नसेल तर त्याबाबत दाद मागता येत नाही. रस्ता हा दावा विषय नाही म्हणून वादी यांचा अर्ज नामंजूर करावा. प्रतिवादी यांचे विधीज्ञ श्री.बी.एस.पाटील यांनी आपली केस शाबीत करण्याकरीता Maharashtra Jeevan Pradhikaran and another Appellant Vs. M/s. Construction P.Ltd. Reported

in AIR 2005 Bombay 161, Bombay High Court चा न्यायनिर्णय दाखल केला आहे. सदर न्यायानिर्णयाचे अवलोकन केले असता सदर न्यायनिर्णयातील परिस्थिती व पार्श्वभूमी ही प्रस्तुत खटल्यातील परिस्थिती व पार्श्वभूमीपेक्षा वेगळी आहे. त्यामुळे सदरचा न्यायनिर्णय हा प्रतिवादी यांना सहाय्यक नाही.

**११.** वादी यांनी प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये जाणेकरीता असलेला रस्त्यामध्ये हरकत व अडथळा करीत आहेत याकरीता कुमार सिध्दाप्पा ऐनापुरे यांचे शपथपत्र नि.७७ कडे व विष्णू शंकर कांबळे यांचे शपथपत्र नि.७८ कडे दाखल केलेले आहे. सदरील साक्षीदाराचे शपथपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी हे वाद मिळकतीमध्ये जाण्याकरीता वादी यांना हरकत अडथळा करीता आहेत.

**१२.** वरील विवेचनेवरुन व उपलब्ध असलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, प्रतिवादी हे वादी यांच्या वहिवाटीकरीता जाणाऱ्या रस्त्यास हरकत अडथळा करीत आहेत. तसेच उपलब्ध कागदोपत्री पुराव्यावरुन व वादी आणि प्रतिवादी यांच्या कथनावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की वादी मिळकत ही वादी याच्या कब्जे व ताब्यात आहे. त्यामुळे दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादी यांनी वादी यांच्या शांततामय कब्जे वहिवाटीस जाणाऱ्या रस्त्याला दावेचा निकाला पावेतो पर्यंत हरकत अडथळा करु नये असा मनाई हुकम प्रतिवादी यांचे विरुध्द देणे योग्य ठरेल. सबब मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज खर्चासहीत मंजुर करण्यात येतो

२. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये वादी यांच्या शांततामय कब्जे वहिवाटीस जाणाऱ्या रस्त्याला दावेचा निकाला पावेतो पर्यंत हरकत अडथळा करु नये अशी प्रतिवादी अगर तर्फे इसमांना तुर्तातुर्त मनाई देण्यात येते.

सही/-

**(संजय दि.वानखेडे)**
**५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर**

**इचलकरंजी**
**दिनांक -०२/०१/२०२४**

**–: प्रमाणपत्र :–**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. निकालपत्र आदेश यामधील सर्व मजकूर मूळ निकालपत्र आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | श्री. मकरंद भि.जाधव |
| न्यायालयाचे नांव | ५ वे सह दि.न्या.क स्तर,इचलकरंजी |
| टाईप/श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | १३/१२/२०२३ |
| न्यायिक अधिका–यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | १३/१२/२०२३ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | १३/१२/२०२३ |